# दुर्गम भागासाठी रुग्णवाहिका

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'क्विक हील फाउंडेशन', 'क्विक हील टेक्नोलॉजीज लिमिटेड'तर्फे वाशिममधील वैद्यकीय अधिकाऱ्यांना दोन अत्याधुनिक रुग्णवाहिका सुपूर्द करण्यात आल्या. 'क्विक हील फाउंडेशन'च्या प्रमुख अनुपमा काटकर, वाशिमचे जिल्हाधिकारी षण्मुगराजन एस., मुख्य कार्यकारी अधिकारी वासुमना पंत, कुलदीप जंगम आणि अजय शिर्के उपस्थित होते. फाउंडेशनने 'आरोग्य यान' या उपक्रमांतर्गत मनोरा आणि रिसोड तालुक्यातील एक लाखांहून अधिक लोकांसाठी आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या अंतर्गत वाशिममध्ये डॉक्टर आणि रुग्णांच्या दुर्गम भागातून रुग्णांची वाहतूक आणि नियमित तपासणी, निदान आणि उपचार यांसारख्या आरोग्यसेवा पुरविण्यात येणार आहेत.